**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,**
**पिंपरी, ४११ ०१८**

# जाहिरात क्र.१८४/२०२२चे अनुषंगाने जाहीर निवेदन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी आस्थापनेवरील गट ब व क संवर्गातील रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाने भरण्यासाठी दि.१४/०८/२०२२ रोजी वर्तमानपत्रात जाहिरात क्र.१८४/२०२२ प्रसिध्द करुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आले आहेत. तथापी प्राप्त शासन निर्णय विचारात घेऊन या जाहिरात व भरती प्रक्रियेमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करणेत येत आहे. त्यानुसार लिपिक पदासाठी अर्ज करण्या-या उमेदवारांना खालीलप्रमाणे शासन निर्णयानुसार संधी देण्यात येत आहे.

१) सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र.संकीर्ण-१११४/प्र.क्र.२००/१६-अ, दि.०४/०९/२०१५ अन्वये प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, सन १९९१ चे जनगणना कर्मचारी, सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी व पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन कर्मचारी या सर्व घटकातील उमेदवारांना टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी दोन संधी तसेच दोन वर्षे इतकी मुदतवाढ देण्यात येत आहे.

२) सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र. अपंग २०१६/प्र.क्र.११६/१६-अ, दि.१६/११/२०१६ अन्वये दिव्यांग उमेदवारांना जर लिपिक पदावर नियुक्ती मिळाली, तर त्यांना टंकलेखनाची(इंग्रजी/मराठी) परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासून ०२ वर्षाच्या कालावधीत व दोन संधीत परिक्षा उत्तीर्ण होण्यासाठी मुदतवाढ देण्यात येत आहे.

३) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१८०/२८, दि.१३/०६/२०१९ अन्वये शासन सेवेत नियुक्ती होताना माजी सैनिक उमेदवारांना टंकलेखनाची परिक्षा उत्तीर्ण होण्यासाठी दोन संधी तसेच ०२ वर्षे इतकी मुदतवाढ देण्यात येत आहे.

४) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. अनाथ-२०२२/प्र.क्र.८४/का-०३, दि.०७/०७/२०२२ अन्वये शासन सेवेत नियुक्ती होताना अनाथ प्रवर्गातील उमेदवारांना टंकलेखनाची परिक्षा उत्तीर्ण होण्यासाठी दोन संधी तसेच ०२ वर्षे इतकी मुदतवाढ देण्यात येत आहे.

सबब पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत प्रसिध्द केलेल्या जाहिरात क्र.१८४/२०२२ मधील लिपिक पदाकरीता वरील शासन निर्णयानुसार नमूद केलेल्या घटकातील उमेदवारांना अर्ज सादर करण्याकरिता परवानगी देणेत येत आहे. त्याप्रमाणे उमेदवारांनी नोंद घेऊन विहीत मुदतीत अर्ज सादर करावेत.

(शेखर सिंह)
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८

क्रमांक - प्रशा/१/कावि/४६५ /२०२२
दिनांक २८/०८/२०२२